| MHSN060006542023 | **नियमित दिवाणी दावा : ७६/२०२३**<br>श्री. अबुबकर मुल्ला वगैरे<br>विरुध्द<br>श्री. देव मारुती मंदीर ट्रस्टी तर्फे श्री. सुनिल गुरव वगैरे |
|---|---|

## निशाणी १० खालील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १/१ ते १/७ व १/९ ते १/१४ यांनी त्यांना कैफीयत दाखल करणेकामी झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफीयत अभिलेखावर घेणेकामी विनंती केली आहे. त्यामध्ये प्रतिवादींचे असे कथन आहे की, त्यांना दावेच्या नोटीसा मिळाल्यानंतर वाद विषयाच्या अनुषंगाने जुन्या कागदांचे रेकॉर्ड ऑफीसमधून काढून त्याबाबतची सर्व माहिती वेळेत वकीलांना देता आलेली नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत त्यांची कैफीयत दाखल करता आली नाही. तसेच सदरचा विलंब हा त्यांनी जाणून बुजून केलेला नाही. सदरचा विना कैफीयत आदेश रदद झालेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार सदर दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्याकरिता त्यांची कैफीयत अभिलेखावर येणे जरुरीचे असल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यामध्ये वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींचे अर्जातील नमूद कारण हे योग्य व संयुक्तिक नाही. प्रतिवादींना दावेच्या नोटीसा दि.२५/०४/२०२३ रोजी मिळालेल्या आहेत. प्रतिवादींना दावा मिळकती संदर्भातील संपूर्ण कागदपत्रांचे ज्ञान/माहिती पूर्वीपासून होती व आहे. तसेच प्रतिवादींना कायदेशीर मुदतीपेक्षा किती दिवसांचा विलंब झाला हे त्यांनी अर्जात नमूद केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे. तसेच यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस प्रतिवादींना जास्तीत जास्त र.रु.५,०००/- इतकी कॉस्ट बसविणेत यावी अशी त्यांनी विनंती केली.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जामधील कथने प्रतिवादी यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादी यांना दिनांक २५/०४/२०२३ रोजी प्रस्तुत दावेचे समन्स लागून ते दि.२७/०७/२०२३ रोजी वकीलांमार्फत हजर झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत दाखल करण्यास जास्तीत जास्त ९० दिवसांचा कालावधी सोडून सुमारे चार महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण योग्य व संयुक्तिक वाटत नाही. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा डिक्लेरेशन, मनाई व कारक ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर दावेचा अंतिम निकाल हा गुणावगुणावर होणेकामी प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. परंतु, त्याकरिता प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब देखील लक्षात घ्यावा लागेल. तसेच झालेल्या विलंबाकरीता त्यांचेकडून काही प्रमाणात खर्चही वसूल करणे योग्य होईल. एकंदरीत वरील सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणेत येतो.

३. प्रतिवादी यांची कैफीयत आज रोजी वाचून दाखल करणेत येते.

४. प्रतिवादी यांनी कैफीयत दाखल करणेकामी झालेल्या विलंबाबाबत र.रु.३००/– कॉस्ट म्हणून वादींना दयावी. सदरहू खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी वादीस न दिल्यास ती दावा खर्चात सामील करुन घेणेत यावी.

Sd/---

मिरज

**(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : ०६/०१/२०२४

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मिरज

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | 4th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 06/01/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 06/01/2024 |
| Order uploaded on | : | 06/01/2024 |